महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.
पणेविभागीय मंडळ. पणे-४११००५

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,**
**PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005**


DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 /

E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in


क्र.पुविमं/शाखा-ओ-१,ओ-२/ 9093
दिनांक ०२/०९/२०२६ ०३

प्रति,

मुख्याधापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक
शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा-पुणे/अहिल्यानगर/सोलापूर.

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्याच्या सूचनांबाबत.

संदर्भ - राज्यमंडळाचे पत्र व प्रकटन क्र.रा.मं./परीक्षा-३/३६४४, दि.०१/०९/२०२६

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते कि, फेब्रुवारी-मार्च २०२७ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यासंदर्भात खालील सुचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज त्याच्या यापूर्वी शिकलेल्या शाळेमधून/कनिष्ठ महाविद्यालयामधून भरणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात आले होते. तथापि अपवादात्मक परिस्थितीत विद्यार्थ्यांना मागील शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामधून खाजगी विद्यार्थी नावनोंदणी करणे शक्य नसेल तर त्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या सध्याच्या रहिवासी पत्ता (Current Address) व त्याबाबतचा आवश्यक तो पुरावा अपलोड करावा. त्यानुसार विद्यार्थ्यांना त्याच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे.

ज्या विद्यार्थ्यांना नाव नोंदणी करताना दूरच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नाव नोंदणी करावी लागत आहे अशा विद्यार्थ्यांच्याबाबत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय निवडीचे कारण सबळ पुराव्यानिशी प्राप्त झाल्यावरच ऑनलाईन अर्ज स्विकारावे.

तरी कोणत्याही विद्यार्थ्याचा खाजगी नावनोंदणी अर्ज नाकारण्यात येऊ नये, तसे आढळून आल्यास मंडळ नियमानुसार कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

MBRaut
डॉ.मिनाक्षी राऊत
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,पुणे-५

Scanned with OKEN Scanner